[redacted]मी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्या शाखे अंतर्गत भूगोल विषयातील पी.एचडी. पदवीसाठी

सादर करावयाचा नियोजित शोधप्रबंधाचा आराखडा

:: संशोधनाचा विषय ::

"लातूर जिल्ह्याचा प्रादेशिक नियोजनाचा भौगोलिक अभ्यास"

:: संशोधक ::

प्रा. दोरवे श्रीमंत रघुनाथ

एम.ए. - भूगोल, बी.एड्.

सररस्वती संगीत कला महाविद्यालय, लातूर ता.जि.लातूर

:: मार्गदर्शक ::

डॉ. आचोले पी.बी.

(एम.ए., एम.फिल., पी.एचडी.)

भूगोल विभाग प्रमुख,

आझाद महाविद्यायल औसा ता.औसा जि.लातूर

:: संशोधन केंद्र ::

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर ता.जि.लातूर

ऑगस्ट २०१७

अनुक्रमणिका

अ.क्र.	प्रकरणाचे नांव
1.	प्रस्तावना
2.	विषय निवडीचा उद्देश
3.	संशोधनाची गृहितके
4.	संशोधनाची उद्दिष्ट्ये
5.	अभ्यास क्षेत्र
6.	संशोधन क्षेत्रातील मर्यादा आणि व्याप्ती
7.	माहिती स्त्रोत / संकलन
8.	संशोधन पद्धती / अभ्यास पद्धती
9.	पुर्व संशोधन आराखडा / आढावा
10.	प्रादेशिक नियोजनाचा अर्थ / संकल्पना, प्रकार व महत्त्व अर्थ, संकल्पना आणि महत्त्व
11.	प्रकरण योजना : प्रकरण 1 ले - प्रस्तावना
	प्रकरण 2 रे - अभ्यास क्षेत्राची प्राकृतिक, सामाजिक व आर्थिक स्थिती
	प्रकरण 3 रे - मानव संसाधन आणि सामाजिक व आर्थिक सुविधांचा विकास
	प्रकरण 4 थे - सेवा केंद्राची निवड आणि अभिक्षेत्रीय वितरण
	प्रकरण 5 वे - केंद्राची केंद्रीयता आणि श्रेणी
	प्रकरण 6 वे - सुक्ष्म प्रादेशिक नियोजनासाठी प्रादेशिक विकासाचे स्तर
	प्रकरण 7 वे - निष्कर्ष, शिफारशी व उपाययोजना

प्रस्तावना :

भारतीय द्विकल्पाचा विचार करता भारत जागतिक लोकसंख्येत दुसऱ्या क्रमांकाचा कृषीप्रधान देश आहे. या कृषीप्रधान देशात 70 टक्के लोकसंख्या खेड्यात राहते. तसेच देशात प्रादेशिक भिन्नता आहे याचाही परिणाम येथील लोकसंख्येवर होतो. त्यामुळे जेव्हा 18 व्या शतकात औद्योगीक क्रांती युरोप खंडात झाली तेव्हा त्याचे विकेंद्रीकरण होऊन संपुर्ण जगात औद्योगीक विकासाला चालना मिळाली आणि सर्वच क्षेत्रात विकासाला संधी मिळाल्या परंतू आजही भारतीय द्विकल्पीय उपखंडाचा विकास साधता आला नाही. त्याप्रमाणेच प्रादेशिक भिन्नतेचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

प्रादेशिक नियोजन ही मानवी भूगोलाची शाखा आहे. प्रादेशिक नियोजनाचा समावेश आर्थिक भूगोलाच्या अनुषंगाने देखील केला जातो. कोणत्याही प्रदेशाचे नियोजन हे किती प्रमाणात झाले हे ओळखायचे असेल तर त्या प्रदेशातील भौतीक सुविधांचा आणि मानवी विकास दर या बाबीचा अभ्यास करणे आवश्यक आहे. आधुनिक काळामध्ये कोणत्याही राष्ट्राचा जर विकास साधावयाचा असेल तर प्रादेशिक नियोजन ही काळाची गरज असून शाश्वत विकास साधावयाचा असेल तर प्रादेशिक नियोजन हे महत्त्वाचे आहे. भारतासारख्या विकसनशील देशाला प्रामुख्याने प्रादेशिक नियोजनाची प्रकर्षाने गरज आहे. कारण देशातील अनेक राज्य प्रादेशिक असमतोलास सामोरे जात आहेत. देशात संपुर्ण समतोल राखावयाचा असल्यास प्रादेशिक नियोजन आवश्यक आहे. जगामध्ये आज भारताची लोकसंख्या दुसऱ्या क्रमांकाची असल्याने देशाला मोठ्या प्रमाणात लोकसंख्या ही एक समस्या ठरत आहे. तेंव्हा देशाला महासत्ता बनवायचे असल्यास प्रादेशिक नियोजन अत्यंत महत्त्वाचे आहे.

कृषी प्रधान असलेल्या भारतीय प्रदेशात आजही शहराच्या मानाने खेड्यांची संख्या अधिक आहे. आजही ग्रामीण खेड्यापर्यंत दळणवळणाची साधने उपलब्ध झालेली नाहीत. पिण्याच्या पाण्यासाठी लोकांना 5 ते 10 कि.मी. पर्यंत पायी प्रवास करावा लागतो. शासकीय योजना राबवण्यात देखील आपण अयशस्वी ठरलो. त्यामुळेच देशात मोठ्या प्रमाणात प्रादेशिक नियोजनाची गरज आहे व हे नियोजन अत्यंत सुक्ष्म स्तरापासून म्हणजे तालुका, जिल्हा नंतर राज्य, देश असे होणे आवश्यक आहे. कारण भारत क्षेत्रफळाच्या दृष्टिने विस्तृत असा देश असून या विशाल देशात

योजना, त्याचे क्षेत्र, प्रदेश विकास या सर्व गोष्टीचे योग्य नियोजन न झाल्यास देशाचा आर्थिक विकासाचा डोलारा बिघडू शकतो यामुळे प्रस्तूत लातूर जिल्ह्याचा एकुण प्रदेशात पाण्याचे दुर्भिक्ष आहे. तसेच भूप्रदेश सुद्धा असमान असल्यामुळे लातूर जिल्हा विकासापासून व प्रादेशिक नियोजनापासून वंचित आहे. त्याचे प्रादेशिक नियोजन झाले तर निश्चित विकास साधता येईल. या उद्देशाने "लातूर जिल्ह्याच्या प्रादेशिक नियोजनाचा भौगोलीक अभ्यास" या प्रबंधाद्वारे प्रादेशिक नियोजनाचा अभ्यास या बाबीचा आढावा घेण्याचा प्रयत्न करणार आहे.

विषय निवडीचा उद्देश :

भारतीय उपखंडातील संस्थानिकांचे विलीनीकरण होऊन भारत इंग्रजांच्या गुलामितुन मुक्त झाला 15 ऑगष्ट 1947 रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. तेंव्हा मराठवाडा निझामाच्या ताब्यात होता. नंतर 17 सप्टेंबर 1948 ला मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळाले आणि 1 मे 1960 रोजी निर्माण झालेल्या महाराष्ट्र राज्यात मराठवाडा समाविष्ट झाला.

भारताचे प्रादेशिक विभाजन होऊन निर्माण झालेल्या महाराष्ट्रात लातूर जिल्ह्याची 1982 रोजी निर्मीती झाली आणि 16 ऑगष्ट 1982 साली लातूर जिल्हा परिषदेची स्थापना करण्यात आली आणि लातूर जिल्हा निर्माण झाला.

आजही लातूर जिल्हा विकासापासून वंचित आहे. त्यामुळे लातूर जिल्ह्याची प्रबंधासाठी निवड केली आहे. तसेच लातूर जिल्ह्यात प्राकृतिक मर्यादा येतात. बालाघाट डोंगर रांगेत पर्जन्य छायेत हा भाग येत असल्याने पाण्याचे दुर्मिक्ष, कृषी क्षेत्र मर्यादा, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, मागासलेपणा त्यामुळे पारंपारिक विचार व शेती होते. त्यामुळे या प्राकृतीक भिन्नतेच्या परिणामामुळे ह्याचे नियोजन होऊन प्रादेशिक समतोल निर्माण होईल आणि आर्थिक प्रगती साधता येईल या उद्देशाने **"लातूर जिल्ह्याचा प्रादेशिक नियोजनाचा भौगोलीक अभ्यास"** या विषयावर संशोधन होणे आवश्यक आहे. त्यामुळे या विषयाची निवड केली आहे.

संशोधनाची गृहितके :-

1) लातूर जिल्ह्यातील सेवा केंद्रातील अंतर समान नसुन त्यात असमानता आढळते.

2) उच्च दर्जाचे सेवा केंद्र हे उच्च दर्जाच्या सेवे बरोबरच कमी प्रतिच्या सेवाही पुरवितात.

3) जिल्ह्यात उपलब्ध असणाऱ्या एकुण सेवा केंद्रामध्ये खाजगी क्षेत्राचा वाटा फार मोठा आहे.

4) लातूर जिल्ह्यातील सेवा केंद्रात विविध प्रकारच्या सेवा सुविधांची कमतरता आहे.

5) लातूर जिल्ह्यातील सेवा केंद्रावर भौगोलीक घटकांचा प्रभाव आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :-

प्रस्तूत संशोधन कार्य खालील उद्दिष्टे समोर ठेवुन करण्यात येणार आहे.

1) अभ्यास क्षेत्रांच्या सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी आणि सुविधांचा अभ्यास करणे.

2) अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्या साधन संपत्तीचा अभ्यास करणे.

3) अभ्यास क्षेत्रातील सेवा केंद्राच्या अभिक्षेत्रीय वितरणाचा अभ्यास करणे.

4) अभ्यास क्षेत्रातील सेवा केंद्राची केंद्रीयता व श्रेणीचा अभ्यास करणे.

5) प्रादेशिक विकासात सेवा केंद्राचे योगदान अभ्यासणे.

6) सुक्ष्म प्रादेशिक नियोजनाच्या विकासाचा स्तर अभ्यासणे.

अभ्यास क्षेत्र :-

भारतातील महाराष्ट्र राज्य एक महत्त्वाचे राज्य असुन महाराष्ट्राच्या दक्षिण पुर्व दिक्षेत आग्नेय उपदिशा येते म्हणजे अग्नेय महाराष्ट्रात मराठवाडा भौगोलीक विस्तार विभागात आहे. अक्षवृत्तीय विस्तार $17^{0}52'$ ते $18^{0}50'$ उत्तर अक्षवृत्त तर रेखावृत्तीय विस्तार $76^{0}18'$ ते $79^{0}12'$ पुर्व रेखांश क्षेत्रफळ 7372 चौ.किमी लोकसंख्या 24 लाख 55 हजार 543 (2011) राज्याच्या क्षेत्रफळापैकी 2.32% क्षेत्र, येथे 2.15% लोक राहतात. औरंगाबाद विभागात क्षेत्रफळापैकी 11.34% क्षेत्र लातूर जिल्ह्याचे आहे. स्थान दक्षिणेला कर्नाटक राज्य उत्तरेला परभणी जिल्हा, ईशान्येला नांदेड जिल्हा आणि पुर्व व दक्षिणेला राज्यसीमा तापमान 40^{0} से. पर्जन्यमान 75 ते 100 सेमी जिल्ह्यात डोंगर रांग आहे येथे एकमेव मोठी नदी मांजरा आहे. येथे मध्य लघु, मोठे एकुण 42 सिंचन प्रकल्प आहेत एकुण सिंचन क्षेत्र 55.955 हेक्टर आहे. जिल्ह्याची समुद्र सपाटीची उंची 336 मी. आहे आणि राज्यात लोकसंख्येनुसार 24 वा क्रमांक जिल्ह्याचा आहे.

साधारण पश्चिम भागात मन्याड, मांजरा, तेरणा नदी खोरे आहेत, हवामान, वनसंपदा व मृदा साधारण रेगुर तर बेसॉल्ट खडकांची मृदा आढळते, त्यामुळे पाणी धारण क्षमता कमी आहे,

पाळीव प्राणी वनस्पती विविधता आहे, छोटे उद्योग आहेत, जिल्हा अशाश्वत पावसाच्या पट्ट्यात येतो त्यामुळे खरीप पिके घेतली जातात, पानझडी वृक्ष, खनिजे आहेत. त्यामुळे जिल्ह्याला नैगर्सीक सौंदर्य प्राप्त होते. परंतू प्रादेशिक नियोजन न झाल्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. या भौगोलीक भिन्नतेचा परिणाम जिल्ह्यात झाला आहे.

संशोधन क्षेत्रातील मर्यादा आणि व्याप्ती :-

1. सदरील संशोधन हे भूगोल विषयातील प्रादेशिक नियोजनाच्या संबंधीत असुन लातूर जिल्ह्यातील प्रादेशिक ग्रामीण व शहरी भागाच्या नियोजनाचा अभ्यास मर्यादीत आहे.
2. प्रादेशिक नियोजनाचे स्वरुप व समस्या संशोधनाचा अभ्यास मर्यादित आहे.
3. लातूर जिल्ह्यातील प्रादेशिक नियोजन करण्यासाठी विशिष्ट कालावधीची निवड करण्यात आली आहे.
4. संकलनात्मक आराखड्यावर प्रादेशिक नियोजन क्षेत्र आणि नियोजन न झालेले क्षेत्र याचा आढावा घेतला जाणार आहे.
5. लातूर जिल्ह्यातील तालुका निहाय नियोजन क्षेत्र आणि लोकसंख्या व सर्व क्षेत्रावर झालेला परिणामांचा आढावा घेतला जाणार आहे.

माहिती स्त्रोत / संकलन :-

या संशोधनासाठी प्राथमिक, दुय्यम स्वरुपाच्या आकडेवारीचा आधार घेतला जाणार आहे. प्राथमिक स्वरुपाची माहिती शासकीय कार्यालये व निवडलेल्या गावातील कांही कुटूंब प्रमुखाशी भेट देऊन प्रश्नावलीच्या माध्यमातुन माहिती घेण्यात येणार आहे. दुय्यम माहिती व आकडेवारी जिल्हा परिषद वार्षिक अहवाल, विविध वर्षातील आर्थिक व सामाजिक समालोचन जनगणना पुस्तिका, (इ.स. 1981, 1991 - 2001, 2011) जिल्हा गॅझेटियर भूगोलाचे विविध संदर्भ ग्रंथ नियोजनाशी संबंधीत मासिके, प्रादेशिक नियोजना बाबतचे ग्रंथ, संशोधन लेख, महाराष्ट्र राज्य संचालनालयाचा अहवाल व इंटरनेट वरील विविध संकेत स्थळावरील माहितीचा आधार घेतला जाणार आहे.

संशोधन पद्धती / अभ्यास पद्धती :-

प्रस्तूत शोधप्रबंधासाठी मिळवण्यात येणारी प्राथमिक व द्वितीयक माहितीचे विश्लेषण विविध तक्ते व आलेखाच्या सहाय्यने केले जाणार आहे हे विश्लेषण करण्यासाठी सांख्यिकी पद्धती वापरली जाणार आहे. सेवा केंद्राचे वितरण दाखवण्यासाठी नकाशा शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केला जाईल.

सेवा केंद्राचे क्षेत्रफळ, वसाहती व लोकसंख्येनुसार असलेले वितरण अभ्यासण्यासाठी खालील सुत्राचा आधार घेतला आहे.

सुत्र :- $SD = \sqrt{\frac{\sum(x-\bar{x})^2}{N}}$

अभ्यास क्षेत्रातील सेवा केंद्राचे वितरण कशा पद्धतीने झालेले आहे हे पाहण्यासाठी निअरेस्ट नेबर पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. यासाठी खालील सुत्र वापरलेले आहे.

सुत्र :- $RN = \frac{\text{Observed mean Distance}}{\text{Expected Mean Distance}}$

$0.5\sqrt{\frac{A}{N}}$

खुलासा :- RN = Randomties

A = Total Area (एकुण क्षेत्र)

N = Total Number of Service (एकुण सेवा केंद्र)

सेवा केंद्राचे प्रभाव क्षेत्र अभ्यासण्यासाठी खालील पद्धतीचा वापर प्रस्तूत संशोधनात केला जाणार आहे. त्यात जॅक्सन यांची सुधारित पद्धत व व्ही.एल.एस. प्रकाशराव यांची सुधारीत पद्धत यांचा वापर करण्यात येईल.

1) 1.1) Jackson's Modified Method =

$$\frac{\text{Total Area}}{\text{Total No. of Service Centers}}$$

1.2) Influence area according of village =

$$\frac{\text{Total Population}}{\text{Total No. of Service Centers}}$$

2) V.L.S. Prakash Rao Method

सुत्र :- $SI = \sqrt{\frac{A \text{ x } MP}{\pi \text{ x } RP}}$

खुलासा :-

SI = Sphere of Influence (प्रभाव क्षेत्र)

A = Area of the District (जिल्ह्याचे एकुण क्षेत्र)

MP = Population of the villages served by the Service Centre (सेवा केंद्राच्या अंतर्गत येणाऱ्या वसातींची लोकसंख्या)

π = 3.14 (Constant Value)

RP = Total Rural Population (एकुण ग्रामीण लोकसंख्या)

पुर्व संशोधन आराखडा / आढावा :-

1) मिश्रा आर.पी. (1969) -

यांनी त्यांच्या "प्रादेशिक नियोजन, तंत्रे, योजना आणि क्षेत्र अभ्यास" या पुस्तकामध्ये प्रादेशिक नियोजनाच्या वेगवेगळया अनुषंगाने अभ्यास करुन उपयोजनाचे महत्त्व विशद केले आहे.

2) मेहता अशोक (1970) -

यांनी "भारतातील आर्थिक नियोजन" हा अभ्यास करत असताना देश पातळीवरील कृषी, वाहतुक, दळणवळण, भूमी उपयोजन, जलसिंचन, उर्जा, लोकसंख्या, नागरीकरण, मजुर क्षमता आणि सामाजिक घटक विचारात घेऊन आर्थिक नियोजन स्पष्ट केले आहे.

3) गट एस.एल. (1976) -

यांनी "हरियाना राज्यातील कर्नाटक जिल्ह्याचे सुक्ष्म नियोजन" या पुस्तकामध्ये सेवा केंद्राची केंद्रीयता तसेच स्तर, रचना इ. घटकाचा अभ्यास केलेला आहे.

4) चंद्र महेश आणि पुरी व्ही.के. (1983) -

यांच्या "भारतातील प्रादेशिक नियोजन" या पुस्तकामध्ये दिर्घ स्तरावरील नियोजन बद्ध, मध्यम व लघु स्तरावरील नियोजन या सर्वांचा अभ्यास करण्यासाठी सांख्यिकी तंत्राचा अवलंब केला आहे.

5) भूपींदर झुल्शी (1987) -

यांनी त्यांच्या "सेवा केंद्र व त्यांचा सभोवतालच्या प्रदेशावरील प्रभाव काश्मीर खोऱ्यातील क्षेत्र अभ्यास" या संशोधन पत्रिकेमध्ये सेवा क्षेत्राचे वर्गीकरण करुन त्यांचे प्रशासकीय नियोजनावर होणारे परिणाम यांचा अभ्यास केलेला आहे.

6) सिंग एस.सी. आणि राजीव कुमार (1992) -

यांनी त्यांच्या "पश्चिम हिमालयातील ग्रामीण विकास एक भौगोलीक अभ्यास" या पुस्तका मध्ये नैसर्गीक व सामाजिक घटकांचे अभिक्षेत्रीय महत्त्व विषद करण्याचा प्रयत्न केला आहे."

7) गुहा बी. (1996) -

यांनी दुगळी जिल्ह्यातील सेवा केंद्राचा अभ्यास करत असताना आरोग्य सेवा केंद्र, शाळा, पोस्ट ऑफीस, कृषी केंद्रे इ. घटकांचा विचार करुन सेवा केंद्राचे महत्त्व स्पष्ट केले आहे.

8) मुलानी ए. (2010)

यांनी त्यांच्या "सोलापूर जिल्ह्यातील सामाजिक व आर्थिक घटकांचे प्रादेशिक नियोजन" या शोधप्रबंधामध्ये जिल्ह्यातील सामाजिक व आर्थिक विकास विशद करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

प्रादेशिक नियोजनाचा अर्थ, संकल्पना, प्रकार व महत्त्व :

प्रादेशिक नियोजनाचा अर्थ :

टेलर यांच्या मते, संपुर्ण पृथ्वीचा भुपृष्ठ हा एकच प्रदेश गृहित धरुन त्यांनी प्रादेशिक नियोजनाचा अर्थ स्पष्ट केला आहे.

पृथ्वी एक संपुर्ण प्रदेश (Earth is whole Region) असे समजले जाते. प्रदेश म्हणजे इतर क्षेत्रापासून भिन्न असलेल्या समान गुण वैशिष्ट्याचा समुच्चय असलेले क्षेत्र होय. असा प्रादेशिक नियोजनाचा अर्थ टेलर यांनी सांगीतला. प्राकृतिक प्रदेश, राजकीय प्रदेश, वनस्पती प्रदेश, हवामान प्रदेश, जैविक प्रदेश असे टेलर यांनी विविध प्रदेश सांगीतले आहेत.

रिचार्ड हॉर्ट शॉर्न यांच्या मते -

प्रदेश म्हणजे असे क्षेत्र की ते इतर प्रदेशापासून वेगळे असते परंतू त्याची वैशिष्ट्ये कांही अंशी सिमेलगतच्या प्रदेशात संक्रमीत झालेली असतात. त्यांच्यात अस्पष्ट अशी सिमा रेषा असते.

जे की आपणास दोन्ही प्रदेशात वैशिष्ट्याची सरमिसळ झालेली पहावयास मिळते. प्रदेशामध्ये प्रादेशिक जीवना बरोबर आर्थिक जीवन सुद्धा समाविष्ट झालेले आहे. आर्थिक, व्यवसाय, प्राथमिक क्रिया, कृषी उद्योग धंदे इ. चा समावेश प्रदेशामध्ये होतो. आर.ई. जेकोन्सन यांच्या मते बौद्धिक प्रकारचे आर्थिक जिवन आपणास मोठ्या प्रमाणावर पहावयास मिळते.

प्रदेश सिमांकीत करत असताना प्रमुख प्रदेश आणि त्या प्रदेशात आधिवास करणारी लोकसंख्या यांच्यामध्ये समरुपता पहावयास मिळते. उदा. शारीरिक वैशिष्ट्ये, पोशाख, राहणीमान, खानपान, सवयी यांच्यात समरुपता पहावयास मिळते अशा प्रकारे प्रादेशिक नियोजन आखत असताना नियोजनाचा आराखडा तयार केला जातो आणि आवश्यक त्या सुविधा, अनुदान पुरविले जाते. त्या प्रदेशाचा समतोल साधावयाचा प्रयत्न केला जातो.

प्रादेशिक नियोजनाच्या संकल्पना :-

"विशिष्ट भौगोलीक प्रदेशात राहणाऱ्या जनसमुदायाच्या उन्नतीसाठी तेथील आर्थिक, सामाजिक व भौगोलीक परिस्थितीच्या संदर्भात नियोजन करण्याची संकल्पना विकसीत झाली असुन प्रादेशिक विषमता कमी करण्याच्या हेतुने मुख्यतः मागास प्रदेशाच्या विकासार्थ विशिष्ट स्तरावर केलेले आर्थिक, सामाजिक, भौगोलिक नियोजन म्हणजेच प्रादेशिक नियोजन होय."

1) वृद्ध नियोजन (Large Planning)

2) मध्यम नियोजन (Medium Planning)

3) लघु नियोजन (Micro Planning)

प्रादेशिक नियोजनाचे महत्त्व :-

प्रादेशिक नियोजनात सामाजिक विषमता दुर करण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबवल्या जातात. व्यक्तिचे राहणीमान, आर्थिक स्थिती, जीवनमान उंचावण्यासाठी प्रादेशिक नियोजन महत्त्वाचे आहे.

प्रादेशिक नियोजनामधून कृषी क्षेत्रातील असमतोल दूर करण्यासाठी जलसिंचन सुविधा नियमित वीज पुरवठा, विविध कृषि अवजारासाठी अनुदान देणे, अल्पदराने संकरीत बी-बियाणे

पुरविणे, रासायनीक खते, सेंद्रीय खते शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावेल यातून कृषी क्षेत्रात समतोल विकास साधता येईल.

प्रादेशिक नियोजनामुळे औद्योगीक विकास साधण्यासाठी शासनाकडून नवीन उद्योग निर्मीती साठी अत्यल्प दराने कर्ज पुरवठा केला जातो ज्यामुळे बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होतो व त्यांना स्थिर जीवन जगता येते. यासाठी प्रादेशिक नियोजन महत्त्वपूर्ण ठरते. गरीब व श्रीमंत दरी कमी करण्यासाठी वेगवेगळ्या शासकीय योजना राबवल्या जातात. त्यामुळे प्रादेशिक असमतोल कमी होऊन प्रादेशिक संतुलन राखले जाते.

प्रादेशिक नियोजनामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात, हाताला काम मिळते, समाजातील गुन्हेगारी, सामाजिक संतुलन या समस्या दुर करता येतात. तरुणांच्या शक्तीचा वापर राष्ट्राच्या विकासासाठी करुन घेण्यास प्रादेशिक नियोजन महत्त्वाचे ठरते. एकुणच गाव ते देश पातळीपर्यंत आपणास कांही अंशी संतुलन साधता येऊ शकते. यातून देशाच्या विकासालाही हातभार लागतो, गावचा विकास म्हणजे देशाचा विकास होय. शहरातील सुखासीन जीवनामुळे लागलेला सुखाचा लळा यामुळे खेडी ओस पडू लागली आहेत आणि लोक शहराकडे स्थलांतर करत आहेत. त्यातून शहरे आज अनेक समस्यांचे आगार बनत आहेत. मात्र खेड्यातील साधन संपत्तीचा वापर करण्यासाठी प्रादेशिक नियोजन महत्त्वाचे आहे. अनेक उद्योगधंदे, शेती विकास, शहरी सेवा, सुविधा खेड्यात उपलब्ध झाल्या तर खेडी ओस न पडता ती समृद्ध होतील.

"म्हणून गांधीजी खेड्याकडे चला असा उपदेश करतात"

प्रकरण योजना :-

* **प्रकरण पहिले - प्रस्तावना**

प्रस्तावना

प्रादेशिक नियोजनाचे महत्त्व

प्रादेशिक नियोजनाच्या पद्धती

सामाजिक व आर्थिक विकास संकल्पना

वस्ती श्रेणीची संकल्पना

अभ्यास क्षेत्राची व विषयाची निवड

उद्दिष्ट्ये

आकडेवारी संकल्पना

अभ्यास पद्धती

पुर्व साहित्याचा आढावा

* **प्रकरण 2 रे - अभ्यास क्षेत्राची प्राकृतिक, सामाजिक व आर्थिक स्थिती**

स्थान

नदी प्रणाली

हवामान

मृदा

नैसर्गीक वनस्पती

भूमी उपयोजन

कृषी

जलसिंचन

लोकसंख्या

वाहतुक व दळणवळण

उद्योगधंदे

वसाहती (वस्त्या)

* **प्रकरण 3 रे - मानव संसाधन आणि सामाजिक व आर्थिक सुविधांचा विकास**

मानव संसाधन सुविधा

आरोग्य सुविधा

शैक्षणिक सुविधा

जलसिंचन सुविधा

कृषी सुविधा

वाहतुक व दळणवळण सुविधा

पोष्ट ऑफीस सुविधा

बाजार केंद्र सुविधा

बँक सुविधा

* **प्रकरण 4 थे - सेवा केंद्राची निवड आणि अभिक्षेत्रीय वितरण**

सेवा केंद्राची निवड

सेवा केंद्राचे वितरण

सेवा केंद्राच्या वितरणावर परिणाम करणारे घटक

सेवा केंद्राच्या वितरणाचे प्रारुप

* **प्रकरण 5 वे - केंद्राची केंद्रीयता आणि श्रेणी**

केंद्रीयता संकल्पना

केंद्रीयतेचे प्रादेशिक वितरण

सेवा केंद्राची केंद्रीयता

सेवा केंद्राच्या केंद्रीयता वितरणाचे प्रादेशिक स्वरुप

सेवा केंद्राची श्रेणी

सेवा केंद्राच्या श्रेणीचे प्रादेशिक वितरण

सेवा केंद्राचे प्रभाव क्षेत्र

सेवा केंद्राच्या श्रेणी वितरणाचे प्रादेशिक प्रारुप

* **प्रकरण 6 वे - सुक्ष्म प्रादेशिक नियोजनासाठी प्रादेशिक विकासाचे स्तर**

विकासाचे स्तर

सामाजिक, आर्थिक विकास आणि सुविधांचे नियोजन

सेवा केंद्राच्या प्रभाव क्षेत्राचे नियोजन

प्रादेशिक विकासात सेवा केंद्राचे योगदान

सेवा केंद्र श्रेणीचा ग्रोथ पोल (Growth Pole)

नविन सेवा केंद्र वस्त्यांची सुचना करणे

विकासासाठी प्रादेशिक नियोजन.

* प्रकरण 7 वे - निष्कर्ष, शिफारशी व उपाययोजना

* संदर्भ : ग्रंथ :

1) Boudville J.R. (1966) Problem of Regional Economics Planning Edinburgh University Press.
2) Misra R.P. (1969) Regional Planning Concepts, Techniques, Policies and case Studies, Concept publication company, New Delhi.
3) Prakashrao V.L.S. (1969) : The Theoretical framework for Regional Planning, Concepts, Techniques, Policies and case studies (Ed.) R.P. Misra, Mysore University Publication.
4) Mehta, Ashok (1970) Economic Planning in India Young India New Delhi.
5) Sen L.K. Et. (1971) Planning Rural Growth Centers for Integrated Area Development - A cast Study, NICD Hyderabad.
6) Sathe, M.D. (1973) Regional Planning an Areal Exercise, Saraswat Prakashan, Poona.
7) Glasson, J. (1974) An Introduction to Regional Planning, London, Hutchinson.
8) Bhat, L.S. (1976) : Micro Level Planning A case study of Karnal, Haryana K.B. Publication, New Delhi.
9) Misra G.K. and Kunda A. (1980) : Regional Planning at the Micro level , Indian Institute of Publication, New Delhi.
10) Divakar R.T., (1982) : Some Aspects of state planning in India Yojana Vol. 26.

11) Khan, Basheer Ahmed (1988) Regional Planning and Economics Development, Pointer Publisher, Jaipur (India.)

12) Khan S.A. (1990) Growth Center and Regional Planning A case study of the Trans - Ghaghra Plain, Pointer publishers, Jaipur.

13) Degaonkar Chaya K. (1997) District planning in India, pointer publishers, Jaipur (India.)

14) Mulani (2010) : Regional planning for Socio - Economic Development in Solapur District Unpublished Ph.D. Thesis, Solapur University Solapur.

संशोधक
प्रा. दोरवे श्रीमंत रघुनाथ
एम.ए. - भूगोल, बी.एड्.
सररस्वती संगीत कला महाविद्यालय,
लातूर ता.जि.लातूर

मार्गदर्शक
डॉ. आचोले पी.बी.
(एम.ए., एम.फिल., पी.एचडी.)
भूगोल विभाग प्रमुख,
आझाद महाविद्यायल औसा ता.औसा
जि.लातूर